**<u>नियमित दिवाणी दावा क्र.९८/२०१६ मधील नि.२३ वरील आदेश</u>**

**( पारीत दिनांक ०६.०१.२०१७)**

**(सदाशिव पवार वगैरे वि. पोपट येवले)**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये दावा दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे.

०२. **<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u> :—**

सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकत ही प्रतिवादी यांचे वडिल दत्तु भिकू येवले यांच्या नावावर होती. त्यांचा मुलगा प्रतिवादी पोपट यांनी प्रस्तुत वादी विरुध्द न्यायालयात दिनांक २०/०३/२०१६ रोजी कॅव्हेट अर्ज दाखल केलेला होता. वास्तविकत: वाद मिळकत ही दत्तु यांच्या पश्चात सदरील प्रतिवादी पोपट व त्यांचे इतर तीन भाउ भरत लक्ष्मण व जितेंद्र यांच्या वडिलोपार्जित मालकी हक्क वारसाची आहे. प्रतिवादी पोपट याने एकटयाने वादी विरुध्द कॅव्हेट अर्ज दाखल केल्यामुळे नजरचुकीने वादी यांनी प्रतिवादीच्या तीन भावांना दाव्यात सामील करण्याचे राहून गेलेले होते. सबब प्रतिवादीच्या इतर तीन भावांना दाव्यात प्रतिवादी क्र.२ ते ४ म्हणून सामील करुन प्रतिवादी पोपट याच्या वडिलांचे नांव दत्तु असे लिहिण्यास व वय ५० लिहावयाचे आहे.

०३. दावा कलम ३,४, ५,८अ व ८ब यामध्ये अर्जात मागितल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी सदर अर्ज दाखल केलेला आहे. सदरील दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही अगर दाव्याच्या कामी कोणतीही विसंगत मागणी निर्माण होत नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली.

०४. प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या अर्जावर म्हणणे न दिल्यामुळे सदर अर्ज त्यांचे विरुध्द विना म्हणणे चालविण्यात आला.

०५. अर्ज व त्यावरील शपथपत्राचे अवलोकन करुन तसेच वादी यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकून असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादींनी मागणी केलेली दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्ती केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सदर दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी व वादी, प्रतिवादीमधील वादाचे कायमचे निराकरण होण्यासाठी मदत होणार आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्जात मागितलेली दुरूस्ती करण्यास परवानगी देणे उचित आहे. सबब मी खालील आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी नि.२३ वरील अर्जात मागितलेली
दुरूस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसांमध्ये करावी.

३. वादींनी खर्चाची रक्कम रूपये ३००/— (र.रु.तीनशे रूपये फक्त) तालुका विधी सेवा प्राधिकरण, वाई येथे जमा करावी.

**वाई**
**दिनांक ०६/०१/२०१७**

**(रोहिणी का.थोरात)**
**दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**वाई, जि.सातारा.**